सकाळ



गडहिंग्लज : 'रवळनाथ'तर्फे डॉ. एस. आर. पाटील यांच्या सत्कारप्रसंगी एम. एल. चौगुले, व्ही. के. मायदेव, वसंत दळवी, डॉ. मनोहर पुजारी उपस्थित होते.

# व्हिजन ठेवल्यामुळेच 'रवळनाथ'ची प्रगती

## डॉ. एस. आर. पाटील : गुणवंतांचा सत्कार

**सकाळ वृत्तसेवा**

गडहिंग्लज, ता. २९ : कोणतीही संस्था एका दिवसात उभी राहत नाही. त्यासाठी अनेकांचे कष्ट असतात, असे प्रामाणिक प्रयत्न व व्हिजन असणाऱ्या व्यक्तींमुळेच 'रवळनाथ'ची वाटचाल यशस्वी सुरू आहे, असे गौरवोद्गार देशभक्त आनंदराव नाईक कला, विज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. आर. पाटील यांनी काढले.

येथील श्री रवळनाथ को-ऑप. हौसिंग फायनान्स सोसायटी व ज्ञानदीप प्रबोधिनीतर्फे गुणवंतांच्या सत्कारप्रसंगी ते बोलत होते. संस्थापक अध्यक्ष एम. एल. चौगुले अध्यक्षस्थानी होते. उपाध्यक्ष व्ही. के. मायदेव, डॉ. मनोहर पुजारी यांची प्रमुख उपस्थिती होती. डॉ. पाटील म्हणाले, 'रवळनाथने बँकिंग व्यवसायासह ग्रामीण विद्यार्थ्यांसाठी ज्ञानदीप प्रबोधिनीच्या माध्यमातून झेप व इंटेट करिअर ॲकॅडमी सुरू केली. देणगीतून संस्था उभारल्या. संस्थेची स्वच्छ प्रतिमा असेल तरच समाज संस्थांच्या पाठीशी राहतो.'

श्री. चौगुले म्हणाले, 'सभासदांचा विश्वास व कुशल कर्मचाऱ्यांमुळे संस्थेची प्रगती सुरू आहे. गुणवत्तापूर्ण काम व सामाजिक बांधिलकी ही संस्थेची खास ओळख समाजात आहे.'

यावेळी गुणवंत प्राचार्य पुरस्काराबद्दल डॉ. एस. आर. पाटील यांचा सपत्नीक सत्कार श्री. चौगुले यांनी तर, वाणिज्य विद्या शाखेच्या अभ्यास मंडळाच्या सदस्यपदी निवडीबद्दल संचालक डॉ. मनोहर पुजारी यांचा सत्कार संचालक विजयकुमार घुगरे यांच्याहस्ते झाला. प्रा. डॉ. दत्ता पाटील यांनी स्वागत, श्वेता टोणेन्नावर यांनी सूत्रसंचालन केले. मीना रिंगणे यांनी आभार मानले. डॉ. आर. एस. निळपणकर, महेश मजती, उमा तोरगल्ली, रेखा पोतदार, सीईओ डी. के. मायदेव, उत्कर्षा पोतदार, सुनील पट्टणशेट्टी, वसंत दळवी उपस्थित होते.